# व्यवसाय शिक्षण धोरण आणणार

## राजेश टोपे यांची ग्वाही, ११ सदस्यीय समितीचा अहवाल शासनाकडे सुपूर्त

**पुणे** | दि. १ (प्रतिनिधी)

व्यवसाय शिक्षणाचे समग्र धोरण निश्चित करून शालेय स्तरापासून ते महाविद्यालयापर्यंत शिक्षण देण्यासाठी येत्या पावसाळी अधिवेशनात या संदर्भातील विधेयक मांडण्यात येणार आहे. कायदा करण्याबरोबरच स्वतंत्र व्यवसाय शिक्षण विद्यापीठाची स्थापना करण्यासंदर्भातील पावले उचलून पुढील वर्षभरात त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे यांनी दिली.

याबाबतचा अहवाल करण्यासाठी ११ सदस्यीय समिती नेमण्यात आली होती. अध्यक्षस्थानी सिम्बायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंगच्या संचालिका डॉ. स्वाती मुजुमदार होत्या. समितीने देशातील व्यावसायिक कौशल्याच्या सद्यस्थितीचा अभ्यास केला व जर्मनी, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, कोरिया, चीन व श्रीलंका या देशांतील व्यवसाय शिक्षणातील प्रवाहांचा अभ्यास केला. त्यानुसार शिफारशी सुचवून अंतिम अहवाल आज टोपे यांच्याकडे सुपूर्त केला. हा अहवाल मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या संमतीने पावसाळी अधिवेशनात मांडला जाईल. पुढील वर्षापासून त्याची कार्यवाही केली जाईल असे टोपे यांनी स्पष्ट केले.

टोपे म्हणाले, सध्या महाराष्ट्रात व्यवसाय शिक्षणाच्या सध्या उपलब्ध असलेल्या पर्यायातून सुमारे ४ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. येत्या काळात व्यावसायिक कौशल्य असणाऱ्या ५ कोटी लोकांची गरज भासणार आहे. ४० लाख कुशल मनुष्यबळ लागणार आहे.

राज्यात स्वतंत्र व्यवसाय शिक्षण विद्यापीठ स्थापन करावे, अशी शिफारस समितीने केलेली आहे. चीनमध्ये अशी १०० तर जर्मनीमध्ये १६० विद्यापीठे स्थापन केलेली आहेत. व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाचा प्रसार, नियमन, विकास, व्यवस्थापन या बाबतीत एक स्वतंत्र अधिकार मंडळ स्थापन करून देण्यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कायदा संमत करण्यात यावा. त्यानुसार महाराष्ट्र व्यवसाय शिक्षण आयोग व गुणवत्ता मुल्यांकन परिषद स्थापन करण्यात यावी. व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमांचा समावेश नववी व दहावीपासूनच करण्यात यावा, १० वीच्या वर्गात असताना विद्यार्थ्यांना एक व्यवसाय शिक्षण विषय ऐच्छीक घेण्याची सोय असावी.

व्यवसाय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रवेश परीक्षेला बसण्याची परवानगी नाही. त्यामुळे पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येत नाही. व्यवसाय शिक्षण घेऊन बारावी देणाऱ्या विद्यार्थ्यांना गणित अथवा विज्ञान हे विषय ऐच्छीक म्हणून घेण्याची परवानगी द्यावी, त्यामुळे त्यांना कोणत्याही सीईटीला प्रवेश मिळू शकेल. असंघटीत क्षेत्रातील मनुष्यबळाची संख्या ९३ टक्के इतकी मोठी असल्याने त्यांच्या गुणवत्ता व कौशल्य विकसनासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. औद्योगिक क्षेत्रांशी सहयोग करार करून व्यवसाय शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सहभागी करून घेतले जाणार आहे.

### ११७९० जागा वाढवल्या

व्यवसायिक शिक्षणाचे महत्त्व अधोरेखीत करण्यासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमातील ११७९० जागा नव्याने वाढवण्यात येणार आहे. त्यामुळे व्यावसायिक शिक्षणातील संधी येणाऱ्या काळात वाढत्या असतील असे टोपे यांनी स्पष्ट केले.